दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २३८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२३ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## कामगार वसाहतीला लागली आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील तळोजा फेज-२ येथील एका सिडकोच्या मास हाउसिंगचे बी.जी. शिर्के या कॉन्ट्रॅक्टरचे काम सुरू असून त्या ठिकाणी तेथील कामगारांसाठी उभारण्यात आलेल्या वसाहतीमध्ये अचानक आग लागून या आगीत काही छोट्या रूमचे मोठे नुकसान झाले आहे.

याठिकाणी सिडकोचे मास हाउसिंगचे काम सुरू असल्याने तिथे काम करणाऱ्या कामगारांसाठी छोट्या छोट्या पत्र्याच्या रूम बनविण्यात आल्या आहेत. या रूम मध्ये एके ठिकाणी अचानक आग लागून ती आजूबाजूला पसरत गेली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे बंब व टँकर पाचारण करण्यात आले व आग आटोक्यात आणण्यात आली आहे. या आगीत वित्तहानी झाली असून जीवितहानी झाली नसल्याचे समजून येत आहे. सदर आग हि सिलेंडरच्या स्फोटाने लागल्याचे प्राथमिक माहिती मिळत आहे.

# तळा शहरात अनधिकृतपणे देशी, विदेशी दारुची खुलेआम विक्री

## अवैध दारूची झिंग, उत्पादन शुल्क विभाग कोमात ; टपऱ्या, ढाबा, चायनीज सेंटर जोमात

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा :** तळा शहरात राज्य उत्पादन शुल्क व स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने दिवसा ढवळ्या टपऱ्या, ढाबा, चायनीज सेंटरवर अनधिकृतपणे देशी व विदेशी दारू विक्री जोमात सुरू आहे काही गावातच थेट गावठी दारू काढण्याचे कारखाने थाटल्याचे समोर येत आहे. हे सर्व घडत असताना यावर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने आर्थिक उन्नती करत सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत. तळा तालुक्यातील अवैधरित्या सुरू असलेली दारू विक्री थांबवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.




तळा तालुक्यात विनापरवाना देशी विदेशी गावठी अवैध्य दारू टपऱ्या, ढाबा, चायनीज सेंटरवर रस्त्यावर शेड मध्ये जोरात विक्री सुरू आहे मात्र उत्पादन शुल्क विभाग यंत्रणा मात्र ढीम्म आहे. मोठ्या प्रमाणात विनापरवाना देशी वेदेशी दारू आणून विक्री सुरू आहे. या अवैध्य दारू विक्रीतून मोठी आर्थिक उलाढाल होत आहे सहज दारू मिळत असल्याने येथील बहुतांश नागरिक विशेष तरुण युवक दारूच्या नादाला लागले आहेत. दारूच्या व्यसनामुळे मोठ्या प्रमाणावर अपघात वाढले आहेत.अपघातामुळे कित्येक नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गावात तळिरामांची गजबज असते बऱ्याचदा तळीरामांमध्ये भांडणे होतात याचा त्रास परिसरातील रहिवाशांना होतो.

अवैध दारू विक्रेत्यांना यंत्रणेचा धाक राहिलेला नाही उत्पादन शुल्क विभाग तालुक्यात कधी येते ते कळतच नाही कारण ते अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाईच करत नाहीत. अमावास्या आणि पौर्णिमा सारखे येतात आणि जातात यामुळे दारू विक्रेते मुजोर झाले आहेत. तळा शहरात सर्रास अवैध्यपणे दारू विक्री कुणाच्यातरी आशीर्वादाने सुरू आहे. तालुक्यात अवैध देशी विदेशी दारू कशी व कोठून विक्रीसाठी येते याची सखोलपणे चौकशी होणे गरजेचे आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपेचे सोंग घेत असले तरी नागरिक झोपलेले नाहीत तालुक्यातील अवैध देशी विदेशी दारू विक्री त्वरित बंद करण्यात यावी अशी मागणी महिला व नागरिकांकडून केली जात आहे.

## जनजागरण रथयात्रेस उदंड प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओबीसी जागर अभियान अंतर्गत भाजप उत्तर रायगड व पनवेल शहर ओबीसी मोर्चातर्फे जनजागरण रथयात्रेचे आयोजन रविवारी पनवेलमध्ये करण्यात आले होते. भाजप मध्यवर्ती कार्यालय येथे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या हस्ते या रथयात्रेस शुभारंभ झाला. या जनजागरण रथयात्रेस नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात इम्पिरिकल डेटा गोळा करण्यासाठी ठाकरे सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. सरकारने केवळ तात्पुरता अध्यादेश काढून ओबीसी समाजाची दिशाभूल चालवली आहे. हे सरकार ओबीसी समाजाबाबत उदासीन आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे राज्य मागास आयोगाची या सरकारने केलेली दुर्दशा. ओबीसी समाजाला गृहित धरले जात आहे. या वेळी जर ओबीसी समाज एकत्र आला नाही, तर ओबीसींचे राजकीय अस्तित्व संपून जाईल आणि सामाजिक अस्तित्वदेखील धोक्यात येईल. त्यामुळे ओबीसी समाजाने एकत्र यावे यासाठी हे अभियान राबवले जात आहे.

यावेळी ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, उत्तर रायगड अध्यक्ष राजेश गायकर, सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा महिला संयोजक सीता पाटील, पनवेल शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, महिला संयोजक ॲड. वृषाली वाघमारे, महापालिका प्रभाग समिती अध्यक्ष सुशीला घरत, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका राजश्री वावेकर, सरचिटणीस अभिलाषा ठाकूर, हेमांगी वाघमारे, सदस्य भारती घरत, विभूती तांडेल, शैला आंबेकर, जरीना शेख, खैरे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव-भगिनी उपस्थित होते. रथयात्रा पनवेल परिसरात फिरून ओबीसींच्या हक्काचे राजकीय आरक्षण त्यांना मिळालेच पाहिजे यासाठी जागर करण्यात आला. राज्यातील महाविकास आघाडी सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे आज राजकीय आरक्षण गेले. उद्या शिक्षण आणि नोकरीचे आरक्षणही काढतील. या पार्श्वभूमीवर समाजात या संदर्भात जागर झाला पाहिजे आणि जोपर्यंत ओबीसीचे राजकीय आरक्षण पूर्ववत होणार नाही तोपर्यंत ही लढाई सुरूच राहील, अशी भूमिका या जागर यात्रेची आहे.

### खोपोली - कर्जत मार्गावर अरुंद

## अर्धवट रस्त्यांमुळे कार रस्त्यावरून पलटी होता होता वाचली

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कर्जत-खोपोली रस्त्यांवर हाळ खुर्द गावासमोर सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास पुण्याहून कर्जतकडे जात असताना एक हुंडाई कंपनीची कार (एमएच-१२-केवाय-७३६३) ही रस्त्यांवरून खाली उतरल्याने पलटी होतो हता वाचल्याने मोठी दुर्घटना टळली.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, सिमेंट काँक्रीट रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या तीन ते चार वर्षापासून सुरु असून हाळ फाटा ते कर्जतपर्यंत अनेक ठिकाणी रस्ता अर्धवट ठेवण्यात आल्याने परिणामी दररोज अपघात व रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. ज्या ठिकाणी रस्त्यांचे काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणी अनेक जागी रस्ता खचला असून जागोजागी तडे गेल्याने खड्डे पडले आहेत. रस्ता पूर्ण झाल्यावर ठेकेदाराकडे चार वर्ष हा रस्ता देखभाल दुरुस्तीसाठी राहणार असून ज्या जागी रस्ता फुटला आहे किंवा खचला आहे, तो रस्ता ठेकेदार पुन्हा तोडून नवीन बनविणार असल्याचे एमएसआरडीसीचे अधिकारी माने यांनी नुकतेच सांगितले.

.../२

## संक्षिप्त...

### मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची प्रकृती स्थिर ; फिजिओथेरपी सुरू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची प्रकृती या महिन्याच्या सुरुवातीला अचानक बिघडल्याने त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या मणक्यावर एचएन रिलायन्स रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. दरम्यान, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रकृतीबाबत राज्याच्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. त्या पार्श्वभूमीवर आता मुख्यमंत्री कार्यालयानेच उद्धव ठाकरे यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाने यासंदर्भातील ट्विट केले आहे. त्यात मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मणक्यावर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच सध्या त्यांच्यावर फिजिओ-थेरेपी सुरू आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. तसेच त्यांना लवकरच रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात येईल, असे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांच्या प्रकृतीबद्दल माहिती देत त्यांनी पूर्णपणे बरे झाल्यावरच काम सुरू करावं, कोणताही धोका पत्करू नये, असा सल्ला दिला होता. मुख्यमंत्री अजूनही रुग्णायात आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहेत. कालच त्यांच्यासोबत फोनवरून माझी चर्चा झाली. लवकरच ते घरी जातील, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.

## उपमुख्यमंत्री अजित पवार रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे रायगड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा सविस्तर जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-



मंगळवार दि.२३ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११.२० वा. फोर ओक्स हेलिपॅड, महाबळेश्वर, जि.सातारा येथे आगमन. सकाळी ११.२५ वा . हेलिकॉप्टरने, दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगडकडे प्रयाण. सकाळी ११.५५ वा. कार्ले गाव हेलिपॅड, दिवेआगर जवळ, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी १२.०० वा. सुवर्ण गणेश मंदिर,दिवेआगर येथे आगमन व सुवर्ण गणेश मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा.(खासदार सुनिल तटकरे), दुपारी १.३० ते दुपारी २.४५ वा. राखीव. (श्री.उदय बापट, सरपंच दिवेआगर), नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी २.५५ वा. कार्ले गाव हेलिपॅड, दिवेआगर जवळ, ता.श्रीवर्धन येथे आगमन. दुपारी ३.०० वा. हेलिकॉप्टरने मुंबईकडे प्रयाण.

## उरण काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुन्हा साखळी उपोषण

### साखळी उपोषणाचा ९२ वा दिवस ; तरीही अजून शेतकऱ्यांना न्याय मिळेना

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण काळाधोंडा येथील स्थानिक भूमीपुत्र असलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा विविध मागण्या संदर्भात आज दि २२ नोव्हेंबर २०२१ रोजी साखळी उपोषणाचा ९२ वा दिवस आहे. तरी अजूनही या शेतकऱ्यांना न्याय मिळालेले नाही.अजूनही शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत त्यामुळे आता थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच यात लक्ष घालावे अशी मागणी आता उरण तालुक्यातील काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की उरण तालुक्यातील कोटनाका-काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी रेल्वे प्रकल्पा करिता रेल्वे व सिडको प्रशासन मार्फत संयुक्त रित्या संपादित करण्यात आली त्याबदल्यात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कोणतेही नुकसान भरपाई मिळाले नाही. त्यामुळे आक्रमक झालेल्या संतप्त शेतकऱ्यांनी २७/११/२०२० पासून कोटनाका येथे साखळी उपोषणाला सुरवात केली. मध्येच कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाच्या विनंती नुसार कोरोना रोगाचा प्रसार होऊ नये याकरिता सदर साखळी उपोषण हे ८४ व्या दिवशी तात्पुरते स्वरूपात स्थगित करण्यात आले होते. मात्र शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्याने ते साखळी उपोषण पुन्हा दिनांक १५/११/२०२१ रोजी सुरु झाले आहे. जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत हे साखळी उपोषण असेच सुरु राहणार असल्याचे मत नवनीत भोईर, निलेश पाटील यांनी व्यक्त केले. मात्र मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधीकारी कार्यकर्त्यांनी दिला आहे. यावेळी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (उपोषण स्थळी ) नवनीत भोईर, हेमदास गोवारी, निलेश पाटील, सुनील भोईर, सुरज पाटील, भालचंद्र भोईर, महेश भोईर, कृष्णा जोशी, निलेश पाटील, पुरषोत्तम पाटील, सुरेश पाटील, चेतन पाटील, प्रसाद गोवारी, अजित भोईर, राजेश भोईर, प्रकाश पाटील, मानिक पाटील, योगेश गोवारी, सुभाष गोवारी आदी स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा व कोट ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

उरण तालुक्यातील कोटनाका काळाधोंडा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडको व रेल्वे प्रशासनाने संयुक्तपणे रेल्वे प्रकल्पासाठी संपादित केले मात्र त्याबदल्यात आजपर्यंत येथील शेतकऱ्यांना कोणतेही मावेजा, मोबदला अथवा नुकसान भरपाई मिळालेली नाही. सिडको व रेल्वे प्रशासन चर्चेला सुद्धा तयार नव्हते. सुरवातीपासूनच रेल्वे व सिडको प्रशासनाने येथील शेतकऱ्यांच्या महत्वाच्या समस्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष केल्याने रेल्वे व सिडको प्रशासना विरोधात स्थानिक रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती सेवा संस्था काळाधोंडा तसेच कोट ग्रामसुधारणा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तीव्र आंदोलन व काम बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता या इशाऱ्या कडेही रेल्वे व सिडको प्रशासनाने दुर्लक्ष केले.त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी

.../२

## प्रज्ञा सातव विधानपरिषदेवर बिनविरोध

**दै.रायगड नगरी । मुंबई**

काँग्रेस पक्षाच्या उमेदवार डॉ. प्रज्ञा राजीव सातव यांची विधानपरिषद पोटनिवडणुकीत बिनविरोध निवड झाली. महाविकास आघाडीने सातव यांना पाठिंबा दिला होता, भाजप उमेदवाराने अर्ज मागे घेतल्याने सातव यांची बिनविरोध झाली. ही पोटनिवडणूक बिनविरोध झाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते व महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीतील मित्रपक्ष तसेच विरोधी पक्ष भाजपचे आभार मानले.



निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रज्ञा सातव यांना आज प्रमाणपत्र दिले. यावेळी बाळासाहेब थोरात, नाना पटोले, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप, शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड उपस्थित होत्या. या सर्वांनी विजयी उमेदवार डॉ. प्रज्ञा सातव यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, दिवंगत राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा यांना विधानपरिषदेवर बिनविरोध पाठवत महाराष्ट्रातील राजकीय परंपरा जपली गेली आहे. सध्या महाविकास आघाडी विरुद्ध भाजप असा टोकाचा संघर्ष पाहायला मिळत असताना भाजपने सातव

.../२

## एसटीचा संप कधी मिटणार?

### त्रिसदस्यीय समितीने २० डिसेंबरपर्यंत प्राथमिक अहवाल द्यावा : हायकोर्ट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एसटी कामगारांच्या संपाचा तिढा अद्यापही कायम आहे. विलिनीकरणाचा मुद्दा संप मिटण्यातील प्रमुख अडथळा ठरत असल्यानं मुंबई उच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीच्या वेळी याबाबत महत्त्वाचे निर्देश दिले. 'राज्य सरकारनं नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीनं इतर संघटनांच्या प्रतिनिधींचंही म्हणणं ऐकून २० डिसेंबर रोजी प्राथमिक अहवाल द्यावा,' अशा सूचना न्यायालयानं दिल्या.



गेल्या २० दिवसांपासून सुरू असलेला एसटीचा संप मिटवण्यासाठी सरकारी पातळीवर जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्यास यश येताना दिसत नाही. विलिनीकरण ही मागणी कामगारांनी ठामपणे लावून धरली आहे. तर, त्यावर लगेचच कुठलाही निर्णय घेता येणार नाही. समितीच्या अहवालाची वाट पाहावी, अशी राज्य सरकारची भूमिका आहे. त्याच अनुषंगानं आज न्यायालयानं २० डिसेंबरपर्यंत प्राथमिक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

'एसटी संप सुरू असल्यानं ग्रामीण भागातील विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. विद्यार्थ्यांना करोनाच्या संकटामुळं आधीच दीड वर्षापासून प्रभावी शिक्षणापासून वंचित राहावं लागलं आहे, त्यांचं आणखी नुकसान होता

.../२

# आहे स्वच्छ तरी...

धुळींनी माखलेले रस्ते, जागोजागी साठलेले कचऱ्याचे ढीग, उकिरड्यांवर कुजत असलेला कचरा, गटारे बनून वाहत असलेल्या नद्या, पावसाळ्यात साचलेली डबकी... आपल्याकडील कोणत्याही शहरांना लागू होणारे हे वर्णन. शहरांतील सार्वजनिक अस्वच्छतेचे हे चित्र अद्याप पूर्णपणे बदलले नसले, तरी त्यात बदल होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. केंद्राचे 'स्वच्छ भारत मिशनस्वच्छ भारत मिशनस्वच्छ भारत मिशन' या प्रयत्नांचा एक मोठा घटक. या योजनेच्या अंतर्गत विविध निकषांवर शहरी आणि शहरी भागांची पाहणी करून जाहीर होणाऱ्या स्वच्छ शहरांच्या क्रमवारीला महत्त्व प्राप्त झाले आहे. यंदाच्या क्रमवारीत महाराष्ट्राने उल्लेखनीय कामगिरी केली असून, विविध गटांत सर्वाधिक ९२ पुरस्कार मिळविले आहेत. ही निश्चितच कौतुकास्पद कामगिरी. त्यासाठी निकषांची पूर्तता करणारी सर्व यंत्रणा, स्थानिक नागरिक आणि नेतृत्व अभिनंदनास पात्र आहे. ही क्रमवारी जाहीर झाल्यानंतर स्वच्छतेबाबत अधिक–उणे असलेल्या मुद्द्यांची जाहीर चर्चा होणे, गतवर्षीच्या क्रमवारीशी आणि अन्य शहरांच्या कामगिरीशी तुलना होणे आणि पुढील वर्षी क्रमवारी सुधारण्यासाठी प्रयत्न होणे, हे या योजनेचे यशच म्हणावे लागेल. देशातील नागरी भागांत सार्वजनिक स्वच्छतेचे व्यापक भान निर्माण करण्यात आणि याबाबत प्रशासनात कृतिशीलता आणण्यात ही योजना परिणामकारक ठरत असल्याचे दिसते; तथापि ही योजना तांत्रिक होत असून, कागदपत्रांची पूर्तता करण्यावर भर दिले जात असल्याचेही चित्र आहे. स्वच्छ क्रमवारीत स्थान मिळवणारी शहरे प्रत्यक्षात अस्वच्छ दिसतात, ती यामुळेच. सर्व कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या शहरांत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसण्याने योजनेतील दोष आणि प्रशासनाची बेफिकिरी अधोरेखित होते. कागदपत्रांतून दिसणारे लोभस चित्र आणि वास्तव यांमध्ये जेव्हा अजिबात फारकत होणार नाही, तेव्हाच या योजनेला खरे खुरे यश मिळेल. स्वच्छतेच्या दिशेने कृतिशील पावले टाकण्यास 'स्वच्छ भारत'मुळे चालना मिळते, हे मात्र नाकारता येणार नाही. त्यामुळेच या योजनेच्या विविध निकषांत उत्कृष्ट कामगिरी करणारी शहरे दखलपात्र ठरतात. देशपातळीवर सलग पाचव्यांदा इंदूरने पहिले स्थान पटकावले आहे. मध्य प्रदेशमधील या शहरात स्वच्छतेबाबत व्यापक सजगता आली असून, कचरा निर्मूलनापासून त्यावर प्रक्रिया करण्यापर्यंत विविध प्रकारची यंत्रणा तिथे सज्ज असल्याचा निष्कर्ष काढता येईल. महाराष्ट्रातील कोणत्याही शहराला अद्याप असे सातत्य दाखविता आलेले नाही. राज्यात प्रथम स्थानी असलेल्या नवी मुंबईची गेल्या वर्षीच्या तिसऱ्या स्थानावरून यंदा चौथ्या स्थानावर घसरण झाली आहे. त्याची कारणे शोधून नवी मुंबई प्रशासनाला सुधारणा कराव्या लागतील. या क्रमवारीत सुरुवातीपासून पुणे शहर स्थान पटकावत असले, तरी गेल्या वेळी ते पंधराव्या क्रमांकावर होते; मात्र त्यानंतर आवश्यक त्या सुधारणा केल्याने पुण्याने या वर्षी पाचव्या स्थानी झेप घेतली आहे. सर्व कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असल्याने आणि कचरा टाकून दिला जात नसल्याने झेप घेता आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, पुण्याच्या हद्दीत २३ गावांचा समावेश झाल्याने कचऱ्याबाबत आव्हाने वाढली आहेत. त्याचा विचार करायला हवा. मोठ्या शहरांतील सर्वाधिक शाश्वत शहर हा पुरस्कार पुण्याला मिळाला असला, तरी एकुणात प्रथम येण्याचे उद्दिष्ट समोर ठेवायला हवे. ठाणे, नाशिक, पिंपरी–चिंचवड, औरंगाबाद, नागपूर, कल्याण–डोंबिवली, वसई विरार या मोठ्या शहरांनीही क्रमवारीत स्थान मिळविले आहे; परंतु त्यांपैकी काहींच्या स्थानांत घसरण झाली आहे. एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांत विटा शहराने अव्वल स्थान पटकावले असून, लोणावळा, सासवड, पाचगणी यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एकुणात शहरांतील स्वच्छतेबाबत महाराष्ट्राने ठसा उमटविला आहे; परंतु सुधारणा करण्यासही वाव आहे. शहरांची स्वच्छता ही फक्त स्थानिक प्रशासनाचीच जबाबदारी नाही. तिथे राहणाऱ्या सर्व नागरिकांनीही ती जबाबदारी आहे. त्यामुळे याची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि एकूणच जागरूकता आणण्यासाठी प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्याचीही गरज आहे. ओला आणि कोरडा कचरा वेगळा ठेण्यापासून सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता न करण्यापर्यंत अनेक बाबी नागरिकांना पुन:पुन्हा सांगण्याची आवश्यकता आहे. आपण राहतो तो परिसर आणि ते शहर स्वच्छ असायलाच हवे आणि त्यासाठी आपण योगदानही द्यायला हवे, याचे भान प्रत्येकाला यायला हवे. 'स्वच्छ'च्या पाहणीत स्थानिकांचे मत विचारत घेतले जात असले, तरी याबाबत लोकशिक्षण कितपत आहे हे पाहायला हवे. स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि शहरांत मोठ्या प्रमाणावर असलेल्या सोसायट्या यांची अधिक चांगल्या प्रकारे मदत घेता येऊ शकते. कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया, शाश्वत उपाय आदींसाठी आपल्या पातळीवरून प्रयत्न करणाऱ्यांची दखल घ्यायला हवी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निकषांची कागदोपत्री पूर्तता करण्यावर भर देण्याऐवजी कृतिशीलतेवर भर हवा. स्वच्छ योजनेतील क्रमवारी आणि स्थानिक स्वच्छता यांमध्ये स्पष्ट संगती हवी. ती नसेल तर क्रमवारीत प्रथम येऊनही उपयोग नाही.

# सुधागडात अतिवृष्टीने भातशेतीचे मोठे नुकसान ; शेतकरी विमा भरपाई पासून वंचित



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात मागील वर्षी मुसळधार पाऊस, परतीचा पाऊस,अतिवृष्टीमुळे भात शेतीचे अतोनात नुकसान झाले. तालुका कृषी कार्यालयाकडून पंचनामे उशिरा सादर झाल्यामुळे तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना नुकसानीचा विमा मिळालेला नाही. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा व आंबा पिकविमा भरपाई लवकर मिळावी. याबरोबरच यावर्षी विम्याच्या हप्त्याची रक्कम चारपट वाढवली आहे ती गेल्या वर्षी एवढीच करावी अशी मागणी सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. किसान सन्मान शेतकरी गटाच्या वतीने पाली–सुधागड तहसिलदारांना या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की या विषयी तहसील कार्यालयाकडे व कृषी विभागाकडे यापूर्वी निवेदन दिले आहे. मात्र विमा कंपनीकडे कृषी विभागाने काय पाठपुरावा केला या विषयी अजून माहिती मिळाली नाही. कोरोना काळात अनेकांचे रोजगार गेले यामध्ये शेतकरी सुद्धा बेजार झाला. अशातच या वर्षी आंबा विमा हप्ता रकमेत चार पटीने वाढ करून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचा सरकारने घाट घातला आहे. मागच्या वर्षी हेक्टरी ७००० रु विमा हप्ता होता मात्र या वर्षी हेक्टरी २९४०० रु एवढी चारपट वाढ विमा कंपनीने केली आहे. वाढती महागाई, वाढलेली मजुरी आणि उत्पादनात झालेली घट पाहता ही रक्कम खूप अधिक आहे. त्याच प्रमाणे या महिन्याच्या ३० तारखेपर्यंत विमा हप्ता रक्कम भरणे आवश्यक असताना मागील वर्षाचा विमा नुकसानीची भरपाई आजतागायत शेतकऱ्यांस मिळाली नाही. असे निवेदनात म्हटले आहे. अशा कठीण परिस्थितीत विमा हप्ता रक्कम न भरल्याने अनेक शेतकरी संकटात येणार आहेत. असे सामाजिक कार्यकर्ते विद्देश आचार्य यांनी सांगितले. त्याच प्रमाणे तालुक्यात अनेक आदिवासी बांधवांना वन दळीच्या जागा शासनाकडून दिल्या आहेत. अशा जागेवर त्यांनी आंबा लागवड केली आहे. मागील काही वर्षे त्यांनी विमा भरलेला होता. मात्र आता त्यांना विमा हप्ता भरण्यास अडचणी येत आहेत. सदर ७/१२ विमा पोर्टलवर प्रमाणित होत नसल्याने विमा स्वीकारला जात नाही. त्यामुळे या सर्व अडचणी दूर करून मागण्या पूर्ण कराव्यात असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी गणपत सितापराव, निलेश शिर्के, आप्पा खताळ, चिमा वारगुडे व प्रदीप दोरे आदींसह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# भारती विद्यापीठ फार्मसी महाविद्यालयामध्ये ऑफलाईन वर्ग सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डॉ. पतंगराव कदम सर संस्थापक, भारती विद्यापीठ यांनी १९६४ मध्ये पुणे येथे भारती विद्यापीठाची स्थापना केली. स्थापनेपासून, भारती विद्यापीठाने शैक्षणिक, विशेषतः उच्च आणि व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात वाखाणण्याजोगी प्रगती केली आहे. आता, संस्थेअंतर्गत पूर्व–प्राथमिक शाळांपासून पदव्युत्तर संस्था आणि विद्यापीठापर्यंत विविध प्रकारच्या सुमारे१८० शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. त्याअंतर्गत ७८ हून अधि क शाळा आणि ६० उच्च शिक्षण संस्था यांचा समावेश आहे उदाहरणार्थ मेडिसिन, दंत चिकित्सा, आयुर्वेद, होमि ओपॅथी, नर्सिंग, फार्मसी, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, हॉटेल व्यवस्थापन आणि खानपान तंत्रज्ञान, पर्यावरण विज्ञान, कृषी इत्यादी. संशोधन उपक्रमांना चालना देण्यासाठी आणि त्यांच्या कॅम्पसमध्ये संशोधन संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने, भारती विद्यापीठाने आरोग्य संबंधित विज्ञान, जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, रसायनशास्त्र आणि सामाजिक विज्ञान या क्षेत्रात पाच विशेष संशोधन संस्था स्थापन केल्या आहेत.

आज, भारती विद्यापीठाचे देशभरात नवी दिल्ली, नवी मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, कराड, सातारा, पाचगणी आणि विदेशातही (दुबईला) कॅम्पस आहेत. भारती विद्यापीठ ही कदाचित महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे ज्याची शाखा भारताच्या राजधानीत आहे. केवळ शहरी भागातच भारती विद्यापीठाने संस्था सुरू केल्या आहेत असे नाही. येथील शाळा आणि महाविद्यालये ग्रामीण भागात आणि अगदी दुर्गम आदिवासी आणि महाराष्ट्राच्या किनारपट्टीच्या भागातही आहेत.

भारती वि द्यापीठ नवी मुंबई कॅम्पस बेलपाडा, खारघर येथील सेक्टर ७ आणि सी.बी.डी. च्या सेक्टर ८ मध्ये दोन कॅम्पस मध्ये विस्तारलेले आहेत. या कॅम्पस मध्ये भारती विद्यापीठ इन्स्टि ट्यूट ऑफ फार्मसी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ हॉटेल अँड टुरिझम मॅनेजमेंट स्टडीज, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, भारती विद्यापीठ (डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी) चेडेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ नर्सिंग आणि भारती विद्यापीठ मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा (सी. बी. एस. इ.) आणि ज्युनि अर कॉलेज ई. संस्था कार्यरत आहेत.



# महामार्गावर पार्किंग करणाऱ्या अवजड वाहनांवर उरण वाहतूक शाखेची कारवाई

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदराच्या अनुषंगाने उरण तालुक्यातील उरण – पनवेल व उरण – जेएनपीटी महामार्गावर अवजड कंटेनर ट्रेलर पार्किंग करणाऱ्यांवर न्हावाशेवा वाहतूक पोलिसां बरोबर आत्ता उरण वाहतूक शाखेनेही कंबर कसली आहे. महामार्गावर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलरमुळेच मोठमोठे अप–घात व वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने महामार्गावरीलअवजड वाहनांवर ऑनलाईन दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड यांनी हाती घेतली आहे.

यामध्ये पनवेल – जेएनपीटी महामार्गावरील एल डी टोलनाका,धुतुम,आय ओ टी एल सह अन्य महामार्गावरील बेकायदेशीर पार्किंग हटविण्याची मोहीम हाती घेतल्याने तालुक्यातील महामार्ग मोकळे होऊ ला–गले आहेत.पनवेल – जेएनपीटी हा सर्वात जास्त अवजड वाहतुकीच्या रहदारीचा महामार्ग असून,या महामार्गावर दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे कंटेनर ट्रेलर पार्किंग करीत असल्याने नियमित वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.

या शिवाय तालुक्यातील सर्वच गोदामात कंटेनर ट्रेलर पार्किंगच्या जागेवर अधिक भाड्याच्या लालसेपोटी कंटेनर ठेवले जात आहेत.त्यामुळे जेएनपीटीने अशा पार्किंगच्या ठिकाणी गोदामात कंटेनर ठेवणाऱ्या गोदामांवरही कठोर कारवाईची मोहीम हाती घेण्याची गरज आहे. दरम्यान महामार्गावरील पार्किंग करणाऱ्या अवजड वाहनांवर ऑनलाईन दंडात्मक कारवाईमुळे प्रवासी वाहतुकीचा अडथळा दूर होण्यास मदत होऊ लागली आहे.

त्यामुळे उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड यांच्यासह उपनिरीक्षक संजय पवार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव, पोलिस हवलदार शेंडे, महिला पोलिस हवालदार निता डाऊर पोलिस नाईक विशाल भिसे या वाहतूक पोलिस पथकाने उरण तालुक्यातील रस्त्यांवरील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अवजड वाहनांवर कायदेशीर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अर्धवट रस्त्यांमुळे कार रस्त्यावरून पलटी होता होता वाचली

सिमेंट काँक्रिटचा रस्ता बनून दीड वर्ष झाला असून त्यात रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, तर चार वर्षात काय होईल? असा सवाल उपस्थित होत आहे. ह्या रस्त्यांच्या चौपदरीकरणासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी घेण्यात आल्या, पण व अनेक शेतकऱ्यांना पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांनी रस्ता बनवितांना रोखल्याने रस्त्यांचे काम रखडले आहे. अरुंद व अर्धवट उंच रस्त्यांमुळे वाहन चालकांना अंदाज मिळत नसल्याने अनेक वाहने पलटी होत असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

## उरण काळाधोंडा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुन्हा साखळी उपोषण

कोटनाका येथे जाऊन साखळी उपोषण सुरु केले होते. या उपोषणाचा आज ९२ वा दिवस आहे .आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यात लक्ष घालावे अशी मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.सिडको व रेल्वे प्रशासन, प्रांत कार्यालय पनवेल यांचे संयुक्त बैठक सुद्धा झाले, चर्चा झाली पण शेतकऱ्यांना योग्य तो न्याय मिळू शकला नाही.माहिती अधिकारात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिले गेले नसल्याचे सिद्ध झाले आहे. तरी शासन नुकसान भरपाई बाबत योग्य भूमिका घेत नाही.मंत्रालयात रेल्वे, सिडको व शेतकरी यांच्यात झालेल्या बैठकी दरम्यान मंत्री आदितीताई तटकरे, पालकमंत्री खासदार सुनील तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले होते मात्र यातूनही काहीच निष्पन्न झाले नाही.त्यामुळे या समस्ये संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका सुद्धा शेतकऱ्यांच्या वतीने दाखल करण्यात आली आहे. सर्व प्रकल्पग्रस्त शेतकरी आता न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यात लक्ष घातल्यास ही समस्या सुटेल अशी आशा येथील शेतकऱ्यांना आहे.

## प्रज्ञा सातव विधानपरिषदेवर बिनविरोध

यांच्यासाठी उमेदवारी मागे घेऊन जी राजकीय परिपक्वता दाखवली आहे त्याचे सत्ताधारी पक्षांकडून कौतुक होत आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ सदस्य शरद रणपिसे यांच्या निधनाने रिक्त झालेल्या जागेसाठी ही पोटनिवडणूक जाहीर झाली होती. काँग्रेसने या जागेवर प्रज्ञा सातव यांना उमेदवारी दिली होती तर भाजपकडून सातव यांच्याविरुद्ध संजय केणेकर यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. दरम्यान, प्रज्ञा सातव यांची निवड बिनविरोध व्हावी व परंपरा जपली जावी, असा काँग्रेसचा आग्रह होता. त्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस आणि विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. याबाबत पक्षातील इतर नेत्यांशी चर्चा करून तसेच केंद्रीय नेतृत्वाच्या अनुमतीने आज उमेदवारी मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संजय केणेकर यांनी आज आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर पुढील सोपस्कार होऊन सातव यांची बिनविरोध निवड आता जाहीर करण्यात आली आहे.

## एसटीचा संप कधी मिटणार?

कामा नये. त्यामुळं उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे एसटी बससेवा सुरू राहायला हवी, असं मत खंडपीठानं व्यक्त केलं.

'एसटी महामंडळाचे शंभर टक्के कर्मचारी संपावर आहेत. त्यामुळं कोणीही कामावर रुजू होणार नाही, असा दावा महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कर्मचारी संघटनेतर्फे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी केला. त्यावर, एसटीचे जे चालक आणि वाहक काम करायला येण्यास इच्छुक असतील त्यांना कोणीही अडवू नये आणि महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कर्मचारी संघटनेच्या सदस्यांनी हिंसक मार्गाचा अवलंब करू नये. कोणीही हिंसक आंदोलन केल्यास त्यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे व न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिल्या.

'महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कर्मचारी संघटनेनं हिंसक आंदोलन करणार नसल्याची हमी यापूर्वीच हायकोर्टात दिली आहे. ती हमी यापुढंही पाळली जाईल आणि या संघटनेचे सदस्य आंदोलनात कोणत्याही हिंसक मार्गाचा अवलंब करणार नाहीत, सर्वसामान्य नागरिकांना पुरवल्या जाणाऱ्या वाहतूक सेवेत कोणताही अडथळा आणणार नाहीत, अशी आम्ही अपेक्षा करतो. असे प्रकार कोणीही केल्यास राज्य सरकारनं अशा व्यक्तींविरोधात तात्काळ गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करावी', असं खंडपीठानं सांगितलं.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. श्वेता निखील अगरवाल मौजे : करंजाडे, सेक्टर ४, साईविहार, जि.रायगड यांनी विद्यमान मालक श्री.वसंत दादु पाटील यांच्याकडून कायमस्वरुपी जमीन मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे : तलवडे, ता.अलिबाग येथील मिळकत**

| गाव | स.नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्र.आर. | आकार |
|---|---|---|---|
| तलवडे | १५३ | ०.२९.०० पैकी ०.१३.०० | ००.६२ |

तरी वरील मिळकतीच्या पैकी ०.१३.०० गुंठे विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, दान, जप्ती, व्हिल, लिज, अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून घ्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संबंधित मिळकती संदर्भात खरेदीखत पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२२/११/२०२१

**सही/–**
**ॲड.प्रमिला मोरेश्वर ठाकूर/पाटील**
**रा.विशाल सदानंद पाटील, आशिर्वाद बिल्डींग रुम नं.२, उगमनगर, जुना ठाणा नाका रोड, श्रीसाई ब्लड बँकेच्या मागे, पाण्याच्या टाकीजवळ, पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९८८१९२३०३०**

### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.शशिकांत दाजी शिंदे, रा.बी–८/११, प्रबोधन को. ऑप.हौ.सोसायटी मर्यादित, सेक्टर नं.११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), पनवेल, जि.रायगड–४१०२०६, यांचेद्वारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की,

खालील वर्णनित सदनिका ही आमचे अशिल श्री.शशिकांत दाजी शिंदे यांचे मालकीची आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड**
**फ्लॅट नं. : एल/३**
**वृदांवन जी+३ हौ.को.ऑप.सोसायटी लि.,**
**प्लॉट नं.५२, सेक्टर ९,**
**क्षेत्रफळ : ३५.१४४ स्क्वे. मीटर**

आमचे अशिल श्री.शशिकांत दाजी शिंदे यांचेकडून सदर सदनिकेचे मुळ मालक श्री.शिवाजी विष्णू आंगणे आणि श्रीमती.अर्चना हेमंत येवले व हेमंत बापूराव येवले यांचेमध्ये झालेल्या दि.०७/०३/२००८ रोजी नोंदणीकृत केलेल्या खरेदीखत क्रं.उ र न पनवेल–२–२११४/२००८ या दस्ताची मुळ प्रत दि.२०/११/२०२१ रोजी खांदा कॉलनी ते नवीन पनवेल येथे रिक्षामधून प्रवास करीत असताना सकाळी ११.०० वाजता हरविली आहे.

सदर वर वर्णन केलेल्या दस्ताची प्रत जर कुणाला सापडली तर खालील पत्यावर आणून द्यावी अथवा संपर्क साधावा.

ठिकाण : पनवेल
दि.२२/११/२०२१

**सही/–**
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**पत्ता : मु.पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड–४१०२०६**
**मोबा नं.९०८२९११९१३**

अर्जदारांचे वकील : ॲड.राकेश केणी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.३४/२०२१
ने.ता.२१/१२/२०२१

श्रीमती.इंदुबाई देवीदास कातकरी — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत भिंगार
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा मृत्यू दि.२४/०८/२०२१ रोजी रा.भेरले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी आपला मुलगा कै.जगदीश देवीदास कातकरी, यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.जगदीश देवीदास कातकरी वर नमूद ठिकाणी मृत्यू झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्याांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून, त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.१८ माहे ११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्याया.पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया.पनवेल**

मा.इंदलकर सो.यांचे कोर्ट
ॲड.ज्ञानेश्वर श्री.कुळकर्णी
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.१०६९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/१२/२०२१

श्री.मंगेश रमेशचंद शुक्ला — अर्जदार
विरुद्ध
मा.मुख्याधिकारी तथा निबंधक सो.
जन्म, मृत्यू नोंदणी, पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कु.प्रिन्स मंगेश शुक्ला हे अर्जदार यांचे नात्याने मुलगा असून, कु.प्रिन्स मंगेश शुक्ला याचा जन्म दि.३०/०६/२०१५ रोजी सत्यम मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल ॲण्ड ट्रॉमा केअर सेंटर कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.मंगेश रमेशचंद शुक्ला यांनी जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कु.प्रिन्स मंगेश शुक्ला यांच्या जन्म नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १० अन्वये कु.प्रिन्स मंगेश शुक्ला यांच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखला केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.१८/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्याया.पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया.पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दिव्यांगानी मनातील अपंगत्वचा न्यूनगंड काढावा : साईनाथ पवार

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका दिव्यांग संघटना यांनी रायगड जिल्हातील सर्व दिव्यांग संघटना व दिव्यांग कर्मचारी संघटना अध्यक्ष सचिव सहविचार सभेचे आयोजन २१ नोव्हे २१ रोजी ब्राह्मण सभा हॉल येथे भरविण्यात आली होती.

यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, शासनाच्या दिव्यांगाच्या उन्नतीसाठी विविध योजना ग्राम पातळीवर नगरपातळीवर राबविण्यात येत असून त्याचा लाभ घ्यावा. व शासकीय योजनांची माहिती विषद केली. शासकीय सेवेत देखील आरक्षण असल्याने संधी मिळाली आहे. माणसाला शारीरिक अपंगत्व दुर्दैवाने येत असते. परंतु त्यावरआपण स्वतः खंबीरपणे तोंड दिले पाहिजे. मनाने अजिबात खचून जावू नये. शारीरिकएक बाजू कमकुवत असली तरी एक बाजू अधिक चांगली मजबूत असते इच्छा शक्ती मजबूत ठेवा. मनातील न्युनगंड काढला पाहिजे तरच अंपगात्वावर मात करू शकतो. समाजातील सुदृढ व्यक्तींनी देखील दिव्यांगकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.असेमत व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य दिव्यांग क्रीडा क्षेत्रात आपले बांधव मोठी उत्तम कामगीरी करून नाव उज्वल करीत आहेत.तळा तालूक्यातील विशाल जगताप यांनी कालिकत केरळ पॅरा मास्टर स्पर्धेत तीन सुवर्ण पदक मिळवली यापूर्वी २०१९साली पुणा येथे देखील उत्कृष्ट विजेते पद मिळवले असून त्याचा आदर्श घ्यावा. व आपल्यातून असे अनेक खेळाडू तयार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी त्याचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राज्याध्यक्ष साईनाथ पवार तळा संघटना अध्यक्ष किशोर पितळे उपाध्यक्ष सद्देव पारधी सचीव अमिषभौड, सहसचिव नरेशभौड, सल्लागार सतिश पैठणकर रोहा अध्यक्ष अल्ताफ मुल्ला, गोरेगाव माणगांव अध्यक्ष मुकेश शिंदे, श्रीवर्धन अध्यक्ष निलेश नाक्ती म्हसळा सचिव उमेश अंजारलेकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष किशोर पितळे यांनी संघटनेचे महत्व किती असते हे उदाहरणा सह स्पष्ट करून संघटना बळकट करण्यासाठी तालुका अध्यक्ष सचीव यांना आवाहन केले व उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला तालुक्यातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अवकाळी पावसामुळे कडधान्य पिकाला धोक्याची घंटा

## शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ, जनजीवनावर परिणाम

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

बळीराजाच्या नशिबी सुगीचे दिवस नाहीच या ना त्या कारणाने बळीराजा कायम ग्रासला आहे. त्याच्यावर अनेक प्रकारचे संकट येत असतात जात असतात मात्र तो कधीच खचून जात नाही संपूर्ण जगाचा पोशिंदा समजला जातो सर्वांचीच भूक भागवण्याचे काम कवाड कष्ट करत तो भागवत असतो मागील दोन वर्षे त्याच्यावर अनेक संकट त्यातच गेल्या पाच ते सहा दिवसापासून ढगाळ वातावरणानंतर तसेच दुपार नंतर पडत असलेल्या धुवांधार अवकाळी पावसामुळे रोहा तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्यातच त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. असून शेतकरी–बागायतदारांच्या चिंतेत प्रचंड वाढ झाली आहे. रोहा तालुक्यात खरिपाच्या पिकानंतर शेतकरी कडधान्य व भाजीपाला पीक घेतात परंतु शेतात पाणी साचून राहिल्याने या पिकांना आता धोक्याची घंटा सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांना चिंतेचे ग्रहण लागले असून अधिक कसरत करावी लागत आहे.



भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाज पूर्वसूचनेनुसार दिनांक१७ ते २१ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये बंगालच्या उपसागरामध्ये व अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असल्याने रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी गडगडाटासह विजा चमकणार असून पाऊस व वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला होता मात्र हे अंदाज खरे ठरत असून सद्या कोसळत असलेल्या अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे नुकसान झाले असून यात प्रामुख्याने भात पिकांचे अधिक प्रमाणात नुकसान झाले तर कडधान्य पिकांसह भाजी पाला लागवड व फळ बागायतदारांना मोठा नुकसान सोसावे लागणार असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या पाच सहा दिवसांपासून वीजांच्या गडगडाटासह पडत असलेल्या या अवकाळी पावसामुळे रोहा तालुक्यातील दुर्गम व ग्रामीण भागातील काही शेतकऱ्यांच्या शेतात कापून ठेवलेले भात पिक भिजल्याने नुकसान झाले आहे.शेतात कडधान्य पेरलेल्या वाल,मटकी, मूग,तूर,चणा, आदी. फळ भाजी–पाला व आंबा पिकांवर याचा मोठा परिणाम होण्याची चिंता आता सर्वत्र व्यक्त होत असून या अवकाळी पावसामुळे येथील शेतकरी व बागायतदारांच्या चिंतेत अधिक वाढ झाली असल्याने बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे.

तरी शासनाने याची गांभीर्याने दखल घेत शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करून त्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# शिवसेना पनवेल शहर तर्फे आयोजित आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ११५ नागरिकांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पनवेल शहर व महिला आघाडी तसेच खारघर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, सदर शिबीर पनवेल येथील लाईन आळी, हनुमान मंदिरात संपन्न झाले. यावेळी ११५ नागरिकांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला.



सदर आरोग्य शिबीर यशस्वी होण्यासाठी पनवेल शहर महिला आघाडीच्या उपशहर संघटिका उज्वला गावडे, शाखा संघटिका सुचिता शिर्के शहर शाखा प्रमुख अभिजित साखरे यांच्या पुढाकाराने व खारघर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या डॉ. सरबजीत सिंग कोली, सागर गुंडेवार, बादल तिवारी, सायली वाघमारे,जावेद मणियार, दिनेश नामे, देवदत्त, सिस्टर सायली परब, तसेच श्री हनुमान मंदिर देवस्थान आदींच्या बहुमूल्य सहकार्याने संपन्न झाले, यावेळी शुगर, ब्लड प्रेशर, बी. एम.आय, वजन, फिजिशियन व गायनक कन्सलटिंग तसेच जनरल चेकअप व ब्लडटेस्ट मध्ये ५०% सूट देण्यात आली होती.

या कार्यक्रमाप्रसंगी रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत, जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, महानगर संघटक प्रथमेश सोमण,उपमहानगर प्रमुख दीपक घरत, यतीन देशमुख, शहरप्रमुख अच्युत मनोरे,शहर संघटक प्रवीण जाधव, उपशहर प्रमुख राहुल गोगटे, महिला आघाडीच्या उपतालुका संघटिका सुनंदा पाटील, हर्षाली पराईकर, नीलिमा कुरघोडे, प्रतीक्षा कुरघोडे, उर्मिला कुरघोडे,योगिता कुरघोडे, वैष्णवी कुरघोडे, युवासेनेचे विधानसभा अधिकारी पराग मोहिते, निखिल भगत, किरण तावदरे, प्रसाद पटवर्धन, अमर पटवर्धन, सुमित दसवते, प्रमोद कुरघोडे, संकेत बुटाला, कपिल कुरघोडे, निनाद दामले, राकेश टेमघरे, भावेश शिंदे, गौरव सावंत,मयुरेश कुरघोडे, साहिल मोरे, संकेत दसवते, विवेक पवार,आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# युवतीचे कायदेशीर रखवालीतून अपनयन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमधील सिडको पाली फिल्टर प्लांट रोडपाली तलावाजवळून एका अल्पवयिन युवतीचे कायदेशीर रखवालीतून अपनयन झाल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी तिच्या नातेवाईकांनी कळंबोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. कु. अश्विनी ढाळे असे या मुलीचे नाव असून रंग गोरा, उंची ५ फूट, अंगाने सडपातळ, केस तांबूस, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट आहे. तिच्या अंगात पोपटी रंगाचा कुर्ता व सफेद पायजमा, नाकात सोन्याची वस्तू व पायात सँडल आहे. या युवतीबाबत कोणाला अधिक माहीती असल्यास कळंबोली पोलिस ठाणे किंवा पोलिस उपनिरीक्षक एन.बी. बच्चाव यांच्याशी संपर्क साधावा.

मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६१७/२०२१
नि.नं.७
ने.ता.०६/०१/२०२२

१) श्रीमती.संगीता निलकंठ गायकवाड
२) सनिल निलकंठ गायकवाड
३) पुर्णिमा निलकंठ गायकवाड
४) अभिजीत निलकंठ गायकवाड
सर्व रा.२५७, टेंभोडे गाव, कळंबोली नोड,
कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. निलकंठ चिमाजी गायकवाड यांचे निधन दि.१४/०५/२०२१ रोजी साई एशिअन हॉस्पिटल, अहमदनगर येथे झाले असून अर्जदार १) श्रीमती.संगीता निलकंठ गायकवाड, २) सनिल निलकंठ गायकवाड, ३) पुर्णिमा निलकंठ गायकवाड, ४) अभिजीत निलकंठ गायकवाड सर्व रा.२५७, टेंभोडे गाव, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८ यांनी कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

i) रुम नंबर : ई–००१, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

ii) दुकान क्रं. : ०२, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

iii) दुकान क्रं. : जी–१८, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

iv) दुकान क्रं. : जी–१९, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

v) दुकान क्रं. : जी–२०, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

vi) रुम नंबर : एफ–२०३, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

vii) रुम नंबर : जी–४०२, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

viii) रुम नंबर : जी–१०४, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

ix) रुम नंबर : जी–२०१, ओम रेसिडेन्सी, गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

x) घर क्रं. : २५८ (५), टेंभोडे गाव, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८

xi) घर क्रं. : घर क्रं.२५८ (४), टेंभोडे गाव, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८

xii) घर क्रं. : २५७ (अ), टेंभोडे गाव, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८

xiii) कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या नावे असलेला घर क्रं. : ३०६ (गावदेवी ढाबा) जमिनीतील अविभक्त हिस्सा गट क्रमांक : २८/०६, टेंभोडे गाव, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल–४१०२१८

xiv) कै.निराबाई चिमाजी गायकवाड यांनी केलेले दि.२२/०८/२०१८ चे नोंदणीकृत मृत्यू पत्र क्रं. : पवल २–१४१५–२०१८ नुसार जमिनी ह्या कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या नावे असलेली जमीन गट क्रमांक : ३४/६/अ गाव : टेंभोडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड व गट क्रमांक २८/६ गाव : टेंभोडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड तसेच सेक्टर ४७, प्लॉट नंबर १३, गाव : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

xv) कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या नावे असलेला जमिनीतील अविभक्त हिस्सा गट क्रमांक : ४९/८, गट क्रमांक : ४७/५, गट क्रमांक : ५२/५, गट क्रमांक : ३७/३, गट क्रमांक : ६९/५, गट क्रमांक ७/१/२/२, गट क्रमांक : ७/१/अ, गट क्रमांक : ७/३, गट क्रमांक : ३५/२, गट क्रमांक : ३४/६ अ, गाव : टेंभोडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

xvi) कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या नावे असलेला जमिनीतील अविभक्त हिस्सा. गट क्रमांक : १/१+२+३/अ (क्षेत्र हे.आर. : ०–२१–९ व गटक्रमांक : ४८/३/अ, क्षेत्र.हे.आर : ०–३४–८ एकूण क्षेत्र.हे.आर. : ०–५६–७) गाव : नेवाळी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

अशा वर्णनाची मिळकत

कै.निलकंठ चिमाजी गायकवाड यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वास आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२० माहे ११ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# दरवर्षी प्रमाणे यंदाही वहाळ ते आळंदी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दरवर्षी प्रमाणे यंदाही वहाळ ते आळंदी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पायी दिंडीची सुरुवात शाळेतून, हनुमान मंदिरातून करण्यात आली. नंतर या पायी दिंडीचे श्री साई देवस्थान वहाळ येथे संस्थापक रवींद्र पाटील यांनी स्वागत केले.

यावेळी दिंडीने मंदिरात दर्शन घेऊन पुढील प्रवासास मार्गस्थ केले. यावेळी साई देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य पार्वती पाटील, जगन पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी दिंडीतील भाविकांचे व दिंडीचे अध्यक्ष गोविंद महाराज व कार्याध्यक्ष महंत रामकृष्ण महाराज यांचे साई देवस्थान तर्फे स्वागत करण्यात आले.

कोविड मुळे २ वर्ष खंड पडलेल्या दिंडीने यंदा पुन्हा सुरुवात केली आहे. यावेळी भाविक भक्त मोठ्या उत्साहात दिंडीसाठी निघाले होते.



### तहसीलदार पनवेल यांचे न्यायालयात

क्र.हक्कनोंद/कात–४/एसआर–२०९/२०१९

प्रति,
१) लता बाळाराम मोकल
रा.भगतवाडी, सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
१) कै.हिरा पिलाजी भगत मयत वारस
२) बळीराम हिराजी भगत
३) हनुमान हिराजी भगत
४) चंद्रभागा हिराजी भगत
५) साधना संजय पाटील
६) रुपाली कैलास पाटील
७) सुरेखा मनोहर पाटील
८) द्रोपदी धर्मा ठाकूर
९) नंदा दिलीप पारिंगे
रा.भगतवाडी, सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

सामनेवाले यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी खालील नमूद केलेल्या जमीन मिळकतीबाबत अधिकार अभिलेखात दुरुस्ती करणेकामी विनंती अर्ज दाखल केलेला आहे. त्याअनुषंगाने दि.७/१२/२०१९ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस अर्जदार हजर होते. तदनंतर प्रस्तुत प्रकरणामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेली आहे. मात्र प्रकरणातील सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पुढील सुनावणी निम्नस्वाक्षरीतांच्या समोर दि.३०/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दि.३०/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे पालीदेवद, ता.पनवेल | २४/२ | २६–००–० | --- |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/११/२०२१

सही/–
तहसीलदार पनवेल

मा.राव साहेब

वकील मनोज वारंगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४८०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्रीमती.लिलाबाई लहू ठाकूर
२) श्री कुमार लहू ठाकूर
दोघे रा.घर नं.२४३ अ, मुर्बी गाव, सी.एन.जी.पेट्रोल पंपजवळ, सेक्टर १९, खारघर, ता.पनवेल,
जि.रायगड, नवी मुंबई–४१०२१०
३) श्रीमती.जयश्री वासुदेव पाटील
रा.घर नं.१४५, माथेरान रोड, हनुमान मंदिर जवळ,
दुंद्रे, मुरबे, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई–४१०२०६ अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील मयत कै.लहु काळुराम उर्फ काळ्या ठाकूर रा.मुर्बी गाव, सेक्टर १९, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई यांचे दि.१३/०२/२०२१ रोजी खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

1) Unit Case No.Taloja Panchanand-190 F

| S.No. | H.No. | A.Gts. As. | H.Ars Point | Asstt. |
|---|---|---|---|---|
| 279 | 4 | 0-35-00 | 0.35.00 | 2.75 |

Undivided 1/7 Share in Property as per Award in Unit Case No. Taloja Panchanand-190 F

2) House No.-243 B, Owe/Murbi Gaon, Sector-19, Kharghar Tal.Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai-410210

3) 1/4 undivided Share in respect of Shop No.7, Ground Floor, Royal Plaza Co. op. Housing Society Ltd., Plot No.-42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

4) 1/4 undivided Share in respect of Shop No.12, Ground Floor, Royal Plaza Co. op. Housing Society Ltd., Plot No.-42, Sector-19, Kharghar, Navi Mumbai-410210

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# कळंबोली येथून तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

कु. भारती साहू (रा.–कळंबोली गाव) असे या मुलीचे नाव असून वर्ण गोरा, उंची ४ फूट ५ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, केस काळे, पाठी पर्यंत लांब, कपाळावर फोडींच्या निशाणी, दोन्ही हातांवर जुने काळे डाग आहेत. अंगात ब्राऊन रंगाचा टॉप व प्लाजो घातला आहे. तसेच कानात बाली घातली आहे.

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.रेखा होवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१६७१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्रीमती.कृष्णाबाई गुरुनाथ म्हात्रे
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.शंकुराम गुरुनाथ म्हात्रे
वय : २५ वर्षे, धंदा : व्यवसाय
दोघेही रा.फ्लॅट नं.२०५, निधी पार्क,
प्लॉट नं.३९, साईबाबा मंदिर जवळ, सेक्टर १९,
कामोठे, कळंबोली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.गुरुनाथ पांडुरंग म्हात्रे हे दि.१९/०८/२०२१ रोजी कामोठे येथे झाला आहे. अर्जदार नं.१ ही पत्नी आहे आणि अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. यांनी त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

खालील मिळकतीबाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास हा जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवाव्या. आणि या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

**मालमत्तेची अनुसूची ‘अ’**

मालमत्ता धारकाचे नाव : श्री.गुरुनाथ पांडुरंग म्हात्रे

१) मौजे : रोडपाली–कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड संचिका क्र.२३७, भूखंड क्रं.४०, सेक्टर २०, क्षेत्रफळ–७९९.९५ चौ.मी. पैकी (१/५ हिस्सा) १५९.९९ इतके मुल्य रु.५,००,०००/– (फक्त पाच लाख रुपये)

२) फ्लॅट नं.३०५, तिसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ : ९५० चौ.फूट

३) मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, भूखंड क्र.१५, सेक्टर १४, कळंबोली ४० चौ.मी.

४) फ्लॅट नं.२०४, दुसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ : ६५० चौ.फूट

५) फ्लॅट नं.२०३, दुसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ ८९५ चौ.फूट

६) फ्लॅट नं.२०५, दुसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ ८९५ चौ.फूट

७) फ्लॅट नं.३०३, तिसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ ९०५ चौ.फूट

८) फ्लॅट नं.३०४, तिसरा मजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ ६५० चौ.फूट

९) शॉप नं.४, तळमजला, ‘‘निधी पार्क’’, प्लॉट नं.३९, सेक्टर १९, कामोठे, तालुका : पनवेल. क्षेत्रफळ ४८५ चौ.फूट

दि.२२/११/२०२१

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# रायगड जिल्ह्यातील ७९ कर्मचारी निलंबित

## तर १०३ कर्मचाऱ्यांना बजावली कारणे दाखवा नोटीस ; हजारो विद्यार्थी प्रवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । पेण**

राज्यभरात सुरू असणारा एसटीचा संप दोन आठवडे झाले तरी संपायचा नाव घेत नाही. संप मिटायचा तर सोडाच, याउलट अधिकच चिघळत चालला आहे. रायगड जिल्ह्यातील आत्तापर्यंत ७९ जणांना निलंबित करण्यात आले असून १०३ जणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर दुसरीकडे लॉकडाउन नंतर नुकत्याच शाळा – महाविद्यालये सुरू झाली असून एसटीने प्रवास करणाऱ्या पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना खाजगी वाहनांतून अधिकचे पैसे देऊन प्रवास करावा लागत असल्याने त्यांचे हाल होत आहेत.

एसटी महामंडळाचे शासनात विलिनीकरण करून घेण्यासाठी तसेच इतर महत्वाच्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी राज्यातील अनेक एसटी कामगार संघटना एकत्र येऊन या संपामध्ये सामील झाले आहेत. त्यामुळे राज्यातील संपूर्ण एसटी सेवा ठप्प झाली असून रायगड जिल्ह्यातील एसटी महामंडळाचा कोट्यवधी रुपयांचा नुकसान झाला आहे. सुरवातीला एसटीचा संप एक–दोन दिवसानंतर मिटेल अशी श्यक्यता वाटत होती. मात्र संपकरी आणि राज्य शासन हे दोघेही आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने हा विषय न्यायालयात गेल्याने आता हा संप चिघळणार याची खात्री झाली होती. मात्र संपकरी काही केल्या आपल्या मागण्यांवर ठाम राहिल्याने हे संप मोडीत काढण्यासाठी राज्य शासनाने संपकरी कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्याची सुरुवात केली.

टप्प्याटप्प्याने केलेल्या निलंबनाचा आकडा आजमितीला रायगड जिल्ह्याचा ७९ वर जाऊन ठेपला आहे. मात्र संपकरी कर्मचारी राज्य शासनाच्या या कारवाईला न घाबरता आणि न डगमगता आपल्या मागण्यांवर ठाम राहिल्याने शासनाने दुसरा पर्याय म्हणजे प्रवाशांचे हाल होऊ नये यासाठी परिवहन खात्याच्या खाजगी वाहनांना एसटीच्या दरात प्रवासी वाहतूक करण्याचे आदेश दिले आहेत, राज्य शासनाने तेथेही न थांबता कंत्राटी कामगारांकडे आपला मोर्चा वळवला आणि हजारो कंत्राटी कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यास सुरुवात केली. रायगड जिल्ह्यातील आठ आगारांमधील १०३ कंत्राटी कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र आम्हाला या नोटीस आल्या तरी आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम असून राज्यातील आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आम्ही येथे बसलो आहोत आणि त्यामुळे आम्ही कामावर जात नाहीत असे या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

> शासनाने आम्हा कंत्राटी कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मात्र ही बजावलेली नोटिस चुकीची आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना मिळणारा तुटपुंजा पगार, वेळेवर न मिळणारा बोनस व इतर सोयीसुविधा यांमुळे राज्यातील अनेक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आम्ही बसलो आहोत आणि म्हणून आम्ही कामावर जात नाहीत. आम्हा कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावून शासनाने आमच्यावर अन्याय केला आहे.
>
> **- रामदास पाटील, वाहक**

> लॉकडाउन नंतर शाळा महाविद्यालये सुरू झाली असल्याने आम्ही दरवर्षीप्रमाणे यावेळी देखील एसटीचा प्रवास करण्यासाठी मासिक, त्रैमासिक पास काढले होते, मात्र अचानक एसटीचा संप सुरू झाल्याने आम्ही एसटीच्या प्रवासापासून वंचित राहिलो आहोत, मात्र आता शाळा महाविद्यालयात जाताना खाजगी वाहनांमधून प्रवास करताना आम्हाला जादा पैसे द्यावे लागत आहेत, त्यामुळे आमचे आर्थिक नुकसान होत आहे.
>
> **आकाश मोकल,**
> **प्रवासी विद्यार्थी, कळवे**

### डेपोनिहाय रायगड विभागातील निलंबित कर्मचारी

महाड -५, अलिबाग-१४, पेण-३, श्रीवर्धन-५, कर्जत -६, रोहा -५, मुरुड -३, माणगाव-९, विभागीय कार्यालय-२१, विभागीय कार्यशाळा-८ एकुण -७९

एसटी कर्मचारी आणि राज्य शासन या दोघांमधील अडमुठेपणामुळे सर्वसामान्य प्रवाशांसह विद्यार्थी प्रवाशांचे देखील मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. यात विना पासधारक आणि पासधारक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून एसटीला होणाऱ्या लाखो रुपयांच्या उत्पन्नात घट तर झालीच आहे, शिवाय विद्यार्थ्यांच्या विश्वासास प्राप्त ठरलेल्या एसटीतून जे विद्यार्थी प्रवास करत होते त्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून खाजगी वाहनांमधून अधिकचे पैसे खर्च करून प्रवास करणे भाग पडत आहे. त्यामुळे यातून एसटीला सुद्धा आणि विद्यार्थी प्रवाशांना सुद्धा आर्थिक फटका बसत असल्याने या संपावर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी मागणी विद्यार्थी प्रवासी करत आहेत.

# संक्षिप्त...

## दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई यांच्या वतीने गृहपयोगी साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई यांच्या वतीने रोहे तालुक्यातील नडवली आदिवासी वाडी येथील समाजबांधवांना ग्रुहपयोगी साहित्य लाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

आपल्या महाराष्ट्र राज्यातील गड–किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता ल साफसफाई आदी उपक्रम राबविणारे व गड–किल्ल्यांचा अभ्यास करून आपला ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे काम करणा–या दुर्गवीर प्रतिष्ठानचे माध्यमातून सामाजिक बांधिलकीचे नात्यातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, गरजूंना गरजेच्या साहित्याचे वाटप करणे आदी उपक्रम देखील राबविले जात आहेत. तर त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून नडवली आदीवासी वाडी येथे कपडे, बेडशीट, ब्लँकेट, भांडी तसेच अन्य साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे प्रमुख समीर उंडरे, समिधा उंडरे, प्रभाकर पार्टे, सरपंच रंजना टवळे, उपसरपंच मनोज शिर्के, सदस्य योगेश धामणसे, दत्ता वातेरे, सेवानिवृत्त आदर्श शिक्षक क्रुष्णाराम धनवी, सामाजिक कार्येकर्ते योगेश टवळे, तंटामुक्त समिती अध्यक्ष सदानंद जाधव, सुमित जाधव, चंद्रकांत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.दरम्यान दुर्गवीर प्रतिष्ठान यांच्या या सहकार्याबद्दल उपसरपंच मनोज शिर्के यांनी प्रतिष्ठानचे विशेष शब्दात आभार व्यक्त करून त्यांच्या विविध प्रकारच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत.

## गाडी का ठोकली या वादातून मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गाडी का ठोकली या वादातून मारहाण करण्यात आल्याची घटना पनवेल शहरातील ठाणा नाका मार्गावरील बडी दर्गाजवळ घडली आहे.

मौसिन मिस्त्री (मय–३४) व वैजनाथ आंधळे हे एकमेकांच्या ओळखीचे नसून मिस्त्री यांनी त्यांचा ट्रक त्याठिकाणी उभा करून ठेवला होता. यावेळी वैजनाथ आंधळे हे त्यांच्या ताब्यातील स्विफ्ट गाडी मागे घेत असताना ट्रकला गाडीचा धक्का लागला. याबाबत बोला–चाली होऊन त्यानंतर मौसिन मिस्त्री यांना शिवीगाळ करून हाताचापटाने मारहाण केल्याने गाडी का ठोकली अशी विचारणा केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात केली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## खारघर येथे जनजागरण अभियान



**दै.रायगड नगरी । पनवेल**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सूचनेवरून व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष नाना पाटोलेजी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जनजागरण अभियान खारघर शहरामध्ये महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष कॅप्टन कलावत, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आर सी घरत, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, पनवेल शहर जिल्हा उपाध्यक्ष रेमंड गोवियस यांच्या उपस्थितीत घेण्यात आला.

सदर वाढत्या महागाई पेट्रोल डिझेलच्या किमती व गॅस सिलेंडर या विषयी शहरातील सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन रूपी जनजागरण करत आव्हान या केंद्र सरकारच्या विरोधात करण्यात आला यावेळी खारघर शहर अध्यक्ष विश्वनाथ चौधरी, अभिजीत मुडक्कल, लतीफ नालखंडे, नगरसेविका मंजुला कातकरी, अनुपमा सिंग, खारघर ब्लॉक अध्यक्षा सोनिया सोहोता , किरण तलेकर, भारती जळगावकर, सायरा कुणी, नीता शेनोय व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## अवकाळी पावसामुळे बोर्ली-मांडला, नांदगाव-मजगांव परिसरातील शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या चार दिवसापासून ढगाळ वातावरणानंतर दुपार नंतर पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे मुरुड तालुक्यातील नांदगाव–मजगांव, बोर्ली–मांडला परीसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकरी–बागायतदारांच्या चिंतेत वाढ झाली आहे.साळाव–मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी तसेच बोर्ली स्थानकावरील रस्त्यावर खड्ड्यात पाणी साचून वाहनचालकांना आपली वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे.



भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक१७ ते २१ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये बंगालच्या उपसागरामध्ये व अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असल्याने रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी गडगडाटासह विजा चमकणार असून पाऊस व वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला होता.

गेल्या चार दिवसांपासून वीजांच्या गडगडाटासह पडत असलेल्या या अवकाळी पावसामुळे नांदगाव, मजगांव, बोर्ली, मांडला गावांसह दुर्गम ग्रामीण भागातील काही शेतकऱ्यांच्या शेतात कापून ठेवलेले भात पिक भिजल्याने नुकसान झाले आहे.शेतात पेरलेल्या वाल,रताळी आदी. फळभाजी–पाला व आंबा पिकावर परिणाम होण्याची भिती व्यक्त होत असून या अवकाळी पावसामुळे येथील शेतकरी व बागायतदारांच्या चिंतेत अधिक वाढ झाली आहे.

### जिल्ह्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोविड नियमांचे पालन करून...

## विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करण्यासाठी आदेश जारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आदेशान्वये शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत सुधारीत निर्देश लागू करण्यात आलेले आहेत.

शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील परिपत्रकान्वये राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागात इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि.०४ ऑक्टोबर २०२१ पासून सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षावरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असण्याची शक्यता आहे. तसेच राज्यातील कोविड–१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्य:स्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोविड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियिमित वर्ग सुरु करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी रायगड तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग कोविड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्यास शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील दि.१३ ऑक्टोबर २०२१ च्या परिपत्रका मध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

१८ वर्षावरील विद्यार्थी ज्यांनी कोविड–१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी–ंनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील, ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही. त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती/आस्थापना शासनाने यापूर्वी लागू केल्यानुसार दंडात्मक कारवाईस तसेच भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०,२७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ सह अन्य तरतुदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहील, असे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी कळविले आहे.

## उरण, पनवेल येथे लखीमपूर खिरी हुतात्मा कलश यात्रेचे जोरदार स्वागत

**दै.रायगड नगरी । उरण**

शेतकरी कायदे मागे घेण्याची घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली असली तरीही दिल्लीच्या सीमांवर सुरू असलेले शेतकरी आंदोलन सुरूच आहे. याच आंदोलनाचा एक भाग असलेल्या उत्तर प्रदेश मधील लखीमपुर खेरी मध्ये आंदोलन करून परतणाऱ्या शेतकरी व एका पत्रकारावर वाहन घालून त्यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. या पाच शेतकरी हुतात्म्यांच्या अस्थी कलशाची यात्रा २७ ऑक्टोबर पासून राज्यात पुण्यातील फुले वाड्यातून सुरू करण्यात आली आहे.

ही यात्रा सोमवारी उरण व पनवेल तालुक्यातील विविध ठिकाणी नेण्यात आली. याची सुरुवात पनवेल मधील नवीमुंबई विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्त चिंचपाडा गावातून करण्यात आली.येथील शेतकऱ्यांनी अस्थी कलशाला आदरांजली वाहिली. त्यानंतर अस्थी कलश उलवे नोड, गव्हाण मार्गे जासई येथील १९८४ च्या शेतकरी हुतात्मा स्मारकात दर्शनासाठी ठेवण्यात आला होता.

जासई मधील अनेक मान्यवरांनी तसेच विदयार्थ्यांनी ही आदरांजली वाहिली, त्यानंतर कलश यात्रा दादरपाडा, दिघोडे, विंधणे, भोम मार्गे चिरनेर येथे गेली. चिरनेरच्या स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्मा स्मारकाला अभिवादन करून उरणच्या पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी पाटील,जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी,प्रफुल्ल खारपाटील आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर ही यात्रा भेंडखळ, नवघर मार्गे येथील विविध गोदामात नेण्यात आली. तेथील कामगारांनी या हुतात्मा कलशाला आदरांजली वाहिली.

नंतर जेएनपीटी कामगार वसाहत,बोकडविरा व उरण शहरातून ही यात्रा नेण्यात आली. या यात्रेचे नेतृत्व जेएनपीटी कामगार विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील,किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे,सचिव संजय ठाकूर,सीआयटीयु चे रायगड जिल्हा अध्यक्ष मधुसूदन म्हात्रे,जनवादी महिला संघटनेच्या निरा पाटील,डीवायएफआय या युवक संघटनेचे राकेश म्हात्रे यांनी केले.



## रायगड रत्न, जीवन गौरव सोहळ्यात सत्कार स्विकारताना आनंद अश्रूंना अनावर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

नुकतेच स्थापन झालेल्या रायगड स्फुर्ती सामाजिक संस्था माणगांव यांच्या संकल्पनेतून रविवारी २१ नोव्हेंबर रोजी रायगड रत्न, जीवन गौरव सोहळा माणगांव मधिल डॉक्टर बसवराज डोंगरे व डॉ. सुकेशिनी डोंगरे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन संस्थेचे प्रमुख राजेश अनघळ, डॉ. संजीव कदम, राजेंद्र पोवार सचिन आव्हाड यांच्या प्रमुख उपस्थितीत भावपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. यावेळी माणगांव मधिल विविध क्षेत्रा–तील चौघांचा सत्कार करण्यात आला.





या कार्यक्रमाची सुरुवात सुशिल अभंगे, स्नेहल परांजपे, आश्विनी मुरुडकर या तिघांनी बहारदार गाणी सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. माणगांव मधिल तत्कालिन शालेय जीवनातील मित्र राजेंद्र पोवार, राजेश अनघळ, डॉ संजिव कदम, सचिन आव्हाड यांनी आजवर आपल्या आयुष्यात मिळविलेले यश आणि आज एक जबाबदार नागरिक म्हणुन आपण ज्या गावात शिकलो त्या माणगांवसाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतुन स्थापण केलेल्या रायगड स्फूर्ती संस्थेच्या माध्यमातून समाजातील आजवर ज्यांचे कार्याची दखल कोणीही घेतली नसेल अशा खऱ्या अर्थी यशस्वी आदर्शवत जीवन जगणारे गावातील तुमच्या आमच्यातील सर्वसामान्य परंतु असामान्य कर्तृत्वाचे धनी, हक्कदार लोकांचा सन्मान आपल्या माणगांवकर मित्रमंडळी, हितचिंतक, आप्तस्वकियांच्या उपस्थितीत संस्थेच्या माध्यमातून करण्याचा संकल्प केला.

केवळ पंधरा दिवसात माणगांवशी ज्यांची नाळ जोडली आहे व आपल्या सर्व जुन्या मित्र परिवारांशी आजही ज्यांचे मैत्रीचे ऋणानुबंध आहेत असे उच्च पदस्थ अधिकारी राजेश अनघळ व उच्चशिक्षित पिएचडी.धारक डॉ. संजिव कदम यांनी हा संकल्प पूर्णत्वास नेला आणि संस्थेच्या पहिल्याच सोहळ्यात अशी सर्वसामान्य महिला, जी प्रतिकुल परिस्थितीत जीवनाला सामोरे जात आपल्या मुलांना उच्च शिक्षीत करुन जबाबदार पिढी घडविणारी यशस्वी कष्टाळु, शिस्तप्रिय, प्रेमळ माऊली अर्थात माणगांवच्या श्रीमती गिता जगन्नाथ नागोठणेकर तसेच दुसरी आपल्या पतीचे निधनानंतर प्रतिकुल परिस्थितीचा सामना करीत जीवनाला सामोरी जाणारी महिला विद्या संजय शिंदे तर तिसरे आपल्या छोट्याशा गावी तन–मन–धनाने निस्वार्थी पणे अनेक विद्यार्थ्यांना घडविणारे सेवा निवृत्त शिक्षक वसंत राघोबा दळवी व चौथा प्रतिकुल परिस्थितीत छोट्याशा गावात छपाई उद्योजक म्हणुन यशस्वी पणे कार्यरत नरेश सुर्यकांत बांदोडकर या चौघांचा शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह देऊन यथोचित सत्कार केला.

व्यासपीठावर सत्कार स्विकारताना समाजातील या सत्कारमूर्ति, खऱ्या हिरो आणि गुणवंत गुणीजणांना प्रसंगी भावना व्यक्त करताना डोळ्यातील आनंद अश्रु आवरता आले नाहीत. त्यांचे गौरवपूर्ण कार्य आणि हे दृष्य पाहुन उपस्थितांनाही गहिवरुन आले त्यांनी टाळ्यांच्या गजरात सत्कारमुर्तिंना दाद दिली.

आपल्या संस्थेच्या माध्यमातून गावातील विद्यार्थ्यां साठी चांगले उपक्रम राबवुन गुणीजनांचा सन्मान व प्रोत्साहन तसेच नविन पिढी साठी व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा घेण्याचा संकल्प असुन माणगांवकरांचा सहभाग व सुचनांचे स्वागतच असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सेवा निवृत्त शिक्षिका सुरेखा दांडेकर यांनी केले.

## एस.टी.कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शालेय विद्यार्थी व प्रवासीवर्गाचे हाल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनात विलिनीकरण व्हावे यासाठी सुरू असलेल्या एस टी कर्मचा–यांच्या संपाला आज पंधरावा दिवस असून लालपरी बंद असल्याने मुरुड तालुक्यातील बोर्ली मांडला, नांदगाव मजगांव विशेष करून दुर्गम ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ व प्रवासीवर्गाला हाल व त्रास सहन करावा लागत आहे.



अलिबाग, पुणे, मुंबई, मुरुड अन्य ठिकाणी जा–ये करण्यात खासगी तसेच टू–व्हिलर, थ्रि–व्हिलर आदी.वाहनांचा आधार घेत वेळप्रसंगी जादा भाडे देऊन प्रवास करावा लागतो आहे.

एस.टी.कर्मचा–यांच्या संपावर समन्वयक तोडगा काढला जावा व संप लवकर मिटून एस टी सेवा सुरू व्हावी अशी भावना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.